कौ.हिं.महिलांचे संरक्षण अर्ज क्र. ७१/२०२३
श्रृती विरुध्द अनिरुध्द

**अर्जदार हजर. अर्जदाराचा पुढील उलटतपास शपथेवर जाबदेणार तर्फे विधिज्ञ एस. डी. अरुडे यांचे मार्फत.**

हे म्हणणे खरे आहे की, तेव्हा जाबदेणार याने मला कोणतेही प्रत्युत्तर दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, एप्रिल २०२२ मध्ये जाबदेणार मला भेटण्यास माझे माहेरी आला होता.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की, त्यावेळेस तुमची आई व बहीण उपस्थित होते ?

उत्तर – माझी आई होती.

हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा आम्ही जाबदेणार यांचा कोणताही पाहुणचार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दुसऱ्या दिवशी मी चिडून जाउन जाबदेणार याचेकडे प्रत्येक वेळी पैशांची मागणी करत होते. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा मी जाबदेणार याला असेही म्हटले होते की, तुम्हाला सांगावे लागतेच का ? तुम्ही माझे अकाउंट मध्ये का बरे पैसे जमा केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याला जर तुम्हाला पैसे दयायचे नसेल तर तुम्ही निघून जाउ शकता असे सुद्धा म्हटले होते.

हे म्हणणे खरे आहे की, दि. ०५/०७/२०२२ रोजी मी जाबदेणार सोबत नांदणेस माझे सासरी गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याचवेळी माझा दात दुखत होता. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा जाबदेणार याने मला आपण डॉक्टर कडे जाउन रुट कॅनॉल करुन घेउ असे म्हटले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आम्ही दोघे डॉक्टर कडे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हा डॉक्टरांनी मला सेमी सॉलीड फुड घेण्याचा सल्ला दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी घरी गेल्यावर माझे सासूने सुजीमध्ये बटर घातल्यावर मी त्यांच्या सोबत भांडण केले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी माझे सासूला अपशब्द सुद्धा वापरले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याचकाळात आम्ही दोघे स्त्रीरोग तज्ञाकडे गेलो होतो. त्यावेळी मला डॉक्टरांनी काय सांगीतले होते हे मला सांगता येईल. त्यावेळेस डॉक्टरांनी

आम्हाला रिपोर्टस् नॉर्मल आहेत, कसलीही काळजी करु नका असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर परत मी अमेरिकेला गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, तेथे गेल्यावर मी व जाबदेणार परत स्त्रीरोग तज्ञांकडे गेलो होतो. जाबदेणार याने स्त्रीरोग तज्ञाकडे जावयाचे आहे असे म्हटले होते म्हणून मी गेले होते. त्याने नियमित तपासणी व वार्षिक तपासणी करीता जावयाचे आहे असे म्हटले होते. नियमित तपासणी वेळी मी स्त्रीरोग तज्ञाचा पर्याय निवडला होता. मी नोकरीस लागल्यापासून नियमित तपासणी करते. मी तेव्हा टेस्ट केल्या होत्या. त्या टेस्टमध्ये एक ए.एम.एच. हार्मोनची टेस्ट होती. ते कमी होते.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की, ए.एम.एच. हार्मोन कमी असल्याने नैसर्गिकरित्या अपत्य होउ शकत नाही ?

उत्तर – डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे तसे नसते.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की, तेव्हा जाबदेणारने घाबरु नकोस, आपण उपचार करु असे म्हटले होते ?

उत्तर – तेव्हा जाबदेणार माझे सोबत नव्हते. मी व डॉक्टरच होतो. मी जातांना जाबदेणार यांना सांगितले होते.

हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी जाबदेणार याने घाबरु नकोस असे म्हणून मला विश्वासात घेतले होते.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की, तेव्हा जाबदेणार याने तुम्हाला असेही म्हटले होते की, आपण प्रयत्न करु आणि मुल झाले नाही तर आपण दत्तक मुल घेउ ?

उत्तर – त्यावेळेस सांगितले नव्हते. आम्ही जेव्हा दुसरे डॉक्टरांकडे गेलो होतो व त्यावेळी टेस्ट केली होती तेव्हा बोलले होते. त्यांनी दत्तक मुल घेउ असे म्हटले नव्हते.

हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार याने आपण आय.व्ही.एफ. चा प्रयत्न करु असे सुद्धा सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी जाबदेणारशी गैरवर्तन केले होते.

हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा जाबदेणार यांच्या भावाचा विवाह ठरले होते तेव्हा मी चिडून जाउन ओरडत होते. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हापासून जाबदेणार सोबत माझे वर्तन बदलत गेले. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा जाबदेणारचे भारतात फोन होत होते तेव्हा मी चिडून मला वेळ देत नाही, त्यांनाच वेळ देता असे म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्नामध्ये होणारे खर्चाबाबत जाबदेणार व त्यांचे आईवडील व भावांमध्ये फोनवर संभाषण ऐकून मी जाबदेणार याला त्रास देत होते. हे म्हणणे खरे आहे की, जाबदेणार हा मोठा असल्यामुळे त्याच्या भावाच्या लग्नामध्ये आर्थिक मदत करणार होता याबाबत मला माहिती होते. हे म्हणणे खरे आहे की, भावाचा विवाह धुमधडाक्यात व्हावा अशी जाबदेणारची इच्छा होती. हे म्हणणे खरे नाही की, भावाचे लग्नाकरीता भारतात लवकर जाउ म्हणून त्यासाठी जाबदेणार माझ्याकडे आग्रह करत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी मुद्दामहून भारतात लवकर न जाण्याकरिता विलंब करत होते. त्यानंतर आम्ही जाबदेणार याच्या भावाचे लग्नासाठी भारतात आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, भारतात आल्यावर मी प्रथम अमरावती येथे न जाता पुणे येथे उतरले होते.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की, पुणे येथे तुम्ही दोन दिवस तुमचे बहिणीकडे राहणेस भाग पाडले होते ?

उत्तर – मी भाग पाडले नव्हते, त्यांची शॉपिंग करावयाची होती.

हे म्हणणे खरे नाही की, मला माझे दागिने व कपडे खरेदी करावयाचे होते म्हणून मी पुणे येथे थांबले होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्न दोन दिवसात आहे याची मला माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मागणीनुसार जाबदेणार याने मला काही सोन्याचे व हिऱ्याचे दागिने खरेदी करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे मागणीनुसार सर्व दागिने खरेदी करुन दिले नाही या कारणावरुन आमच्या दोघांमध्ये भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, तरी देखील जाबदेणार याने मला तनिष्क ज्वेलर्स, अमरावती यांचेकडून हिऱ्याचे दागिने व पी.एन.जी. ज्वेलर्स, पुणे यांचेकडून मंगळसूत्र खरेदी करुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार याने मला रुपये दहा हजार रोख रक्कम खरेदी साठी दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला लग्नामध्ये अडथळा निर्माण करावयाचा होता म्हणून मी अतिशय असभ्य वर्तन केले होते. हे म्हणणे खरे

नाही की, मी माझ्या सासूसोबत असभ्य शब्द वापरुन भांडण केले होते.  हे म्हणणे खरे नाही की, लग्नाचा शेवटचा कार्यक्रम होईपर्यंत माझी बडबड चालू होती.  हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा माझी सासू रडायला लागली तेव्हा मी हासून मला अत्यानंद झाला होता.

हे म्हणणे खरे नाही की, लग्नाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २६/०२/२०२३ रोजी मी माझे माहेरी मोशी येथे निघून गेले. हे म्हणणे खरे नाही की, माहेरी गेल्यावर माझे वर्तन जाबदेणार सोबत असभ्य वर्तन होते.  हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार याने मला आपल्याला अमेरिकेत परत जावयाचे आहे असे सांगितले होते.  हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी जाबदेणार यास माझे हवाई प्रवासाचे तिकीट कॅन्सल करा, मला तुझे सोबत अमेरिकेत जायचे नाही असे म्हटले होते.  हे माझ्या लक्षात नाही की, त्यावेळी आमच्या दोघांमध्ये व्हॉटसअप चॅटिंग होत होती.  हे म्हणणे खरे नाही की, मी व्हॉटसअप द्वारे जाबदेणार यास रागाने घटस्फोटाची मागणी केली होती.  हे म्हणणे खरे नाही की, मला जाबदेणार याने कारण विचारल्यावर मी त्याला मला तुझ्या बरोबर यायचे नाही म्हणून घटस्फोट पाहिजे असे म्हटले होते.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की, सदर कारणावरुन तुमचे व जाबदेणार यांचे नातेवाईकांमध्ये बैठक झाली होती ?

उत्तर – बैठक झाली होती परंतू या कारणामुळे नाही.

जाबदेणार याने माझे घरच्यांना बोलावून त्याला घटस्फोट पाहिजे आहे असे म्हटले होते म्हणून बैठक घेण्यात आली होती.  हे म्हणणे खरे आहे की, त्या बैठकीचा विषय फक्त घटस्फोटाचाच होता.  बैठक ही जाबदेणार याचा मित्र विजय गायकवाड व विशाखा गायकवाड यांच्या घरी घेण्यात आली होती.  हे म्हणणे खरे आहे की, त्या बैठकीत जाबदेणार याने मी मानसिक त्रास देते, गैरवर्तन करते व अपमानित करते असे म्हटले होते.  हे म्हणणे खरे नाही की, त्यासाठी मी कबूली दिली होती.  हे म्हणणे खरे नाही की, त्या बैठकीमध्ये नांदण्यास येण्यास नकार दिला होता.  हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी घटस्फोटाची मागणी केली होती.  हे म्हणणे खरे आहे की, नितीन रमेश बेल्हे हेही बैठकीत होते.  हे म्हणणे खरे आहे की, तेव्हा त्यांनी मला मोठयांचा आदर ठेवा असा सल्ला दिला होता.  त्यावेळेस नितीन रमेश बेल्हे याने मला विचार करण्यास वेळ

दया असे म्हटले होते.  हे म्हणणे खरे आहे की, दोघांचाही विवाह मोडू नये अशी त्यांची इच्छा होती.  हे म्हणणे खरे नाही की, त्या बैठकीत मी व जाबदेणार सहा महिने विभक्त राहून काही बदल होतो का असे मध्यस्थांनी म्हटले होते.  हे म्हणणे खरे नाही की, त्या बैठकीत असेही ठरले होते की, सहा महिन्यात आमच्या मध्ये बदल झाला तर एकत्र रहा.  हे म्हणणे खरे आहे की, बैठक संपल्यानंतर मी माझी बहिण योगिता संजय सांभे यांच्याकडे पुणे येथे रहावयास गेले.  हे म्हणणे खरे आहे की, दि. ०८/०३/२०२३ रोजी जाबदेणार अमेरिकेस निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५/०३/२०२३ पासून मी जाबदेणार सोबत सर्व संबंध तोडून टाकले होते.  हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार मला फोन करत होता परंतू मी फोन उचलत नव्हते.  हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडून जाबदेणार याला कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता.  हे म्हणणे खरे आहे की, दि. ०५/०३/२०२३ पासून मी पुणे येथेच राहते.

हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार याने मला किंवा माझ्या नातेवाईकास रुपये ६,८२,०००/– माझे सांगणेवरुन मदतीसाठी दिले होते.  सदर रक्कम जाबदेणार याने दि. १५/०४/२०१९ ते २४/०२/२०२३ पर्यंत दिली होती.  आता मला माझे एच.डी.एफ.सी. बँक, शाखा मुंबई खात्याचा उतारा दाखवण्यात आला.  त्याचा खाते क्रमांक मला आठवत नाही.  हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये नमूद बँकेचा व्यवहार जाबदेणार याने केलेला आहे.  हे म्हणणे खरे नाही की, सदर खात्यामध्ये जाबदेणार याने डॉलरच्या स्वरुपात काही रक्कम हस्तांतर केली होती.  हे म्हणणे खरे आहे की, डॉलरच्या स्वरुपात रक्कम जाबदेणार माझ्या अमेरिकेत असलेल्या बँक खात्यात जमा करत होता.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की, जाबदेणार दरमहा १०० डॉलर तुमचे अमेरिकेत असलेल्या बँक खात्यात जमा करत होता ?

उत्तर – करत होता परंतू नियमितपणे प्रत्येक महिन्यास करत नव्हता.

हे म्हणणे खरे नाही की, माझेवर होत असलेल्या उपचाराचा खर्च जाबदेणार करत होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे लग्नापासून ते दि. ०५/०३/२०२३ पर्यंत जाबदेणार याने माझे खरेदीवर जवळपास सहा लाख रुपये खर्च केलेला आहे.  हे म्हणणे खरे नाही

की, आम्ही अमेरिकेत रहात असतांना सुट्टी मध्ये अमेरिकेत फिरण्यास जात असतांना जाबदेणार याने माझेवर जवळपास ८ ते १० लाख रुपये खर्च केला होता.

हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०८/२०२३ रोजी माझ्या म्हणण्यानुसार जाबदेणार याने मला सहमतीने घटस्फोट घेण्याची नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस मला दि. ३०/०८/२०२३ रोजी मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याचे उत्तर मी दि. ०८/०९/२०२३ रोजी ई–मेल द्वारे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या नोटीसीचे उत्तरामध्ये घटस्फोट देण्याकरीता पाच कोटी रुपयांची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, औषधोपचाराकरीता मी पाच लाख रुपयांची मागणी केली होती.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की, जाबदेणार याला त्रास व्हावा म्हणून तुम्ही विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्याच्या आधारे गु.र.नं. ३०९/२०२३ नोंदवण्यात आला होता ?

उत्तर – जाबदेणार याने मला मारहाण केली होती म्हणून तक्रार दिली होती.

मला तक्रार दिल्याची तारीख आठवत नाही. मला नोटीस मिळाल्यानंतर मी तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी जेव्हा तक्रार दिली तेव्हा जाबदेणार अमेरिकेत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी तक्रार दिली होती.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की, तुमचे सासू–सासऱ्यांना त्रास देण्याकरीता तुम्ही महिला सेल येथे तक्रार देण्यास गेल्या होत्या ?

उत्तर – मी सासू–सासऱ्यांना त्रास देण्याकरीता महिला सेल येथे गेले होते हे खोटे आहे परंतू मी महिला सेल येथे गेले होते हे खरे आहे.

मध्यंतराची वेळ झाल्याने साक्षीदाराचा उलटतपास तहकूब करणेत आला.

| श्रवणोत्तर स्विकृत | समक्ष |
|---|---|
| MAIMUNA SULTANA MOINUDDIN — Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN Date: 2025.12.10 17:39:26 +0530 | MAIMUNA SULTANA MOINUDDIN — Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN Date: 2025.12.10 17:39:31 +0530 |
| (कु.मैमुना सुल्ताना एम.) | (कु.मैमुना सुल्ताना एम.) |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी |
| दि. १०/१२/२०२५ | दि. १०/१२/२०२५ |

कौ.हिं.महिलांचे संरक्षण अर्ज क्र. ७१/२०२३
श्रुती विरुध्द अनिरुध्द

**अर्जदार हजर. अर्जदाराचा पुढील उलटतपास शपथेवर जाबदेणार तर्फे विधिज्ञ एस. डी. अरुडे यांचे मार्फत.**

हे म्हणणे खरे आहे की, माझे शिक्षण बी.ई. (इन्स्ट्रुमेंटेशन) झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे शैक्षणिक पात्रतेच्या आधारावर शासकीय व निमशासकीय कार्यालयात नोकरी मिळू शकते. हे मला सांगता येणार नाही की, मला ३५,०००/– ते दीड लाख पर्यंत पगार मिळू शकतो. मी भाडयाने राहते. हे मी सांगू शकत नाही की, मी अभिलेखावर भाडे करारनामा दाखल केला आहे किंवा कसे. मी अभिलेखावर भाडे पावती दाखल केली नाही. माझे मालमत्तेच्या शपथपत्रामध्ये नमूद खर्चाबाबत माझे शपथपत्राव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा मी अभिलेखावर दाखल केला नाही.

हे म्हणणे खरे आहे की, मी व जाबदेणार एकमेकांसोबत व्हॉटस्अप चॅटींग करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार यांच्या भावाचे लग्न झाल्यानंतर आम्हा दोघांमध्ये ताणतणाव झालेनंतर व्हॉटस्अप चॅटींग सुरु झाली होती. आता मला दिनांक ०८/०२/२०२४ रोजी अभिलेखावर दाखल केलेले व्हॉटसअप चॅटींगचे स्क्रीन शॉट दाखवण्यात आले. सदर चॅटींग मध्ये असलेले मॅसेजेस मी पाठवलेले नाहीत. आता मला त्यावर डी.पी. म्हणून ठेवणेत आलेला फोटो दाखवण्यात आला. सदर फोटो व्यवस्थीत दिसत नाही म्हणून तो माझाच आहे हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अर्ज दाखल करणेस माझेकडे कोणतेही संयुक्तीक कारण नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फकत मला पैसे मिळावेत म्हणून मी सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सगळे स्त्रीधन व दागिने माझ्याकडेच आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि. १८/१०/२०२३ रोजी दाखल केलेली तक्रार ही खोटी दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार यास मानसिक व आर्थिक त्रास व्हावा महणून मी सदरचा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | समक्ष |
| MAIMUNA SULTANA MOINUDDIN Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN Date: 2025.12.10 17:39:38 +0530 | MAIMUNA SULTANA MOINUDDIN Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN Date: 2025.12.10 17:39:42 +0530 |
| (कु.मैमुना सुल्ताना एम.) | (कु.मैमुना सुल्ताना एम.) |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी |
| दि. १०/१२/२०२५ | दि. १०/१२/२०२५ |